पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
कार्यपत्रिका क्रमांक - १६९
<u>सभावृत्तांत</u>

दिनांक- १८.०५.२०१० वेळ - दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक १८.०५.२०१० रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.प्रशांत कृष्णराव शितोळे - सभापती
२. मा.सौ.आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी
३. मा.जितेंद्र बाबासाहेब ननावरे
४. मा.सुरदास तुकाराम गायकवाड
५. मा.सौ.सुलोचना बबन बढे
६. मा.सुमनताई मधुकर पवळे
७. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव
८. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
९. मा.थोरात एकनाथ दादा
१०.मा.तानाजी विठ्ठल खाडे
११.मा.प्रेमकुमार शंकरन नायर उर्फ बाबु नायर
१२.मा.गावडे जयश्री वसंत
१३.मा.सौ.वर्षा विलास मडीगेरी

यशिवाय मा.डुंबरे-अति.आयुक्त,मा.सावंत,मा.झुरे,मा.गायकवाड,मा.पवार, मा.मुंढे,मा.गावडे,मा.गायकवाड-सहा.आयुक्त, मा.काळे-नगरसचिव, मा.उगिले-शहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.सावळे-अति.अधिक्षक अभियंता, मा.पाटील - उपसंचालक(नगररचना),मा.लोंढे-मुख्यलेखापाल,मा.डॉ.अय्यर-वैद्यकिय संचालक, मा.जाधव, मा.कुदळे, मा.चिंचवडे, मा.थोरात, मा.इंगळे,मा.पठाण,मा.बनकर,मा.ढगे, मा.साळवी, मा.दुधेकर, मा.निकम, मा.चव्हाण, मा.पाटील, मा.कांबळे-कार्य. अभियंता, मा.खामकर-उपमुख्यलेखापरिक्षक, मा.पोमण-संगणक अधिकारी, मा.माछरे-विशेष अधिकारी,मा.जाधव - शिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------------------

<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करून घेणेत आले-</u>

विषय क्रमांक- २९) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात ब वर्गदर्जाचे पाणीमीटर बसविणे व देखभाल दुरुस्ती करणे अंदाजपत्रकीय तरतुद वर्ग करणेबाबत...

विषय क्रमांक- ३०) इयत्ता १०वी व १२वी नंतर पुढे काय? कार्यशाळेच्या आयोजनासाठी येणाऱ्या खर्चाबाबत...

विषय क्रमांक- ३१) क्रमिक पुस्तके खरेदी करणेकामी येणाऱ्या खर्चाबाबत...

विषय क्रमांक- ३२) भारताची जनगणना २०११ चार्ज ऑफिसर तथा प्रभाग अधिकारी यांना मंजूर केलेल्या अग्रिमधन रकमेस व त्यापैकी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत...

विषय क्रमांक- ३३) भारताची जनगणना २०११ चार्ज ऑफिसर तथा प्रभाग अधिकारी यांना मंजूर केलेल्या अग्रिमधन रकमेस व त्यापैकी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत...

विषय क्रमांक- ३४) वातावरणातील बदलांबाबत दि. ५ व ६ जून २०१० ची राज्यस्तरीय परिषद आयोजित करणेकामी मनपा हिस्सा रक्कम अदा करणेबाबत...

विषय क्रमांक- ३५) से.नं.२३ वाहतुकनगरी येथील मोकळी जागा भाडेतत्वावर देणेबाबत...

विषय क्रमांक- ३६) ड प्रभागातील पिंपरी येथे महाराष्ट्र राज्य स्थापना सुवर्ण महोत्सवानिमित्त मनपाच्या वतीने आयोजित मराठी तारका कार्यक्रमाकरीता तात्पुरत्या स्वरुपाची ध्वनीक्षेपण,जनित्र व्यवस्था व प्रकाशव्यवस्था करणेचे खर्चास मान्यता मिळणेबाबत...

विषय क्रमांक- ३७) निविदा नोटीस क्र. ई-०९/०२-२००८-०९ मधील कामांचे करारनामे करणेस मंजुरी मिळणेबाबत...

विषय क्रमांक- ३८) मनपाच्या वास्तुविशारद पॅनेलवर नेमणुक करणेबाबत-मा.जयश्री गावडे, मा.सुलोचना बढे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- ३९) दापोडी येथील स्वच्छतागृहांची देखभाल व साफसफाई करणेबाबत-मा.जयश्री गावडे, मा.सुलोचना बढे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- ४०) ब प्रभागातील कीटकनाशक, औषध फवारणी, धूरीकरण व हौसिंग काम देणेबाबत-मा.जितेंद्र ननावरे,मा.एकनाथ थोरात यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- ४१) भोसरी येथील व्यायामशाळेत व्यायाम साहित्य उपलब्ध करुन देणेबाबत - मा.जयश्री गावडे, मा.सुलोचना बढे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- ४२) मनपा कासारवाडी शाळेतील खोल्या भाड्याने देणेबाबत - मा.जितेंद्र ननावरे, मा.एकनाथ थोरात यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- ४३) तरतुद वर्गीकरण करणेबाबत - मा.जयश्री गावडे, मा.सुलोचना बढे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- ४४) पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आकुर्डी पांढारकर वस्ती येथिल पांडूरंग काळभोर सभागृह मालेगांव अंध शिक्षण संस्थेस नाममात्र भाड्याने देणेबाबत - मा.जयश्री गावडे, मा.सुलोचना बढे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- ४५) अ प्रभाग विद्युत विभागांतर्गत होणाऱ्या विविध कार्यक्रमाकरीता तात्पुरत्या स्वरुपात ध्वनीक्षेपण व प्रकाश व्यवस्था करणेबाबत - मा.जयश्री गावडे, मा.सुलोचना बढे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- ४६) मा.स्थायी समिती सभा आयोजनाबाबत - मा.जितेंद्र ननावरे, मा.एकनाथ थोरात यांचा प्रस्ताव...

---------------------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सूचक :- मा.तानाजी खाडे अनुमोदक :- मा.राजेंद्र साळुंके

भारताचे माजी उपराष्ट्रपती भैरवसींग शेखावत यांचे दु:खद निधन झाले असल्याने त्यांस तसेच आकुर्डी येथील पांढरकर व मोरे कुटुंबियांचे अपघाती दु:खद निधन झाले असल्याने त्यांस श्रध्दांजली वाहून दि.१८.०५.२०१० रोजी दुपारी ४:०५ पर्यंत सभा तहकुब करण्यात यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

--------------

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली.)

मा.सभापती :- दि.१८.०५.२०१० रोजी दुपारी ४.०५ पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(प्रशांत कृष्णराव शितोळे)
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.**
**मा.स्थायी समिती**
**कार्यपत्रिका क्रमांक - १६९**
**सभावृत्तांत**
**(दि.१८.५.१० [दुपारी ४.०० वा.] ची तहकुब सभा)**

दिनांक- १८.०५.२०१० वेळ - दुपारी ४.०५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची मंगळवार दिनांक १८.०५.२०१० रोजी दुपारी ४.०० वा. ची तहकूब सभा दि.१८.५.२०१० रोजी दु.४.०५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.प्रशांत कृष्णराव शितोळे - सभापती
२. मा.सौ.आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी
३. मा.जितेंद्र बाबासाहेब ननावरे
४. मा.सुरदास तुकाराम गायकवाड
५. मा.सौ.सुलोचना बबन बढे
६. मा.सुमनताई मधुकर पवळे
७. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव
८. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
९. मा.थोरात एकनाथ दादा
१०.मा.तानाजी विठ्ठल खाडे
११.मा.प्रेमकुमार शंकरन नायर उर्फ बाबु नायर
१२.मा.सौ.वर्षा विलास मडीगेरी

याशिवाय मा.डुंबरे-अति.आयुक्त,मा.सावंत,मा.झुरे,मा.गायकवाड,मा.पवार, मा.मुंढे,मा.गावडे,मा.गायकवाड-सहा.आयुक्त, मा.काळे-नगरसचिव, मा.उगिले-शहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.सावळे-अति.अधिक्षक अभियंता, मा.पाटील - उपसंचालक(नगररचना),मा.लोंढे-मुख्यलेखापाल,मा.डॉ.अय्यर-वैद्यकिय संचालक, मा.जाधव, मा.कुदळे, मा.चिंचवडे, मा.थोरात, मा.इंगळे,मा.पठाण,मा.बनकर,मा.ढगे, मा.साळवी, मा.दुधेकर, मा.निकम, मा.चव्हाण, मा.पाटील, मा.कांबळे-कार्य. अभियंता, मा.खामकर-उपमुख्यलेखापरिक्षक, मा.पोमण-संगणक अधिकारी, मा.माछरे-विशेष अधिकारी,मा.जाधव - शिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------------------

ठराव क्रमांक-११९२८ विषय क्रमांक- १
दिनांक- १८.०५.२०१० विभाग-ब प्रभाग
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.वि/बप्र/३२२/१० दि.६/५/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वॉर्ड क्र.५८ रावेत पुनावळे मध्ये विविध ठिकाणी नव्याने झालेल्या रस्त्यावर जुने पोल फिटींग वापरून दिवाबत्ती सोय करणे कामी दरपत्रके प्राप्त झालेली असून सदरचे काम हे तातडीने असल्याने पुजा इलेक्ट्रीकल वर्कस यांचेकडून अंदाजपत्रक र.रू.४८,९५७/- [र.रू.आठ्ठेचाळीस हजार नऊशे सत्तावन्न] पेक्षा १ % कमी दराने करारनामा व काम करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११९२९ विषय क्रमांक- २
दिनांक- १८.०५.२०१० विभाग-विद्युत जशुके
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वि/जशुके/१/२१४/१० दि.७/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सांगवी स.नं.८४ येथील H.T. कियॉक्स युनिट मधिल सी.टी. बदलणेचे तातडीचे काम मे.व्हॅन इंजि.कं., पुणे यांचेकडून करून घेण्यास व अपेक्षित र.रू.४५,६०५/- [र.रू.पंचेचाळीस हजार सहाशे पाच] मे.व्हॅन इंजि.कं., पुणे यांना करारनामा न करता अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११९३० विषय क्रमांक- ३
दिनांक- १८.०५.२०१० विभाग-झोपडपट्टी निर्मूलन व पूनर्वसन
सुचक- मा.सुमनताई पवळे अनुमोदक- मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.झोनिपू/नि/कावि/९८१/१० दि.७/५/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागा अंतर्गत JNNURM (BSUP)प्रकल्पातील एकूण पात्र १४०० लाभार्थींना ओळखपत्र वाटप करावयाचे असलेने स्थानिक एजन्सी मे.युनिटी अडव्हरटायझींग यांचेकडून प्रकल्पातील एकूण १४०० लाभार्थ्यांचे ओळखपत्र र.रू.२७/- प्रति नग सर्व करांसह करून घेणेस व या प्रकल्पा अंतर्गत असलेल्या पात्र लाभार्थ्यांचे ३१/३/२०११ पर्यंत (१४०० x २७ = ३७,८००/-) र.रू.२७/- प्रति नग याच दरात निविदा न मागविता करारनामा करून न घेता र.रू.३७,८००/- पर्यंत येणाऱ्या खर्चास व त्याचप्रमाणे मार्च २०११ पुर्वी वाटप करावयाचे सदनिका संख्येत वाढ झालेस त्याही पात्र लाभार्थींस ओळखपत्र देणेकामी र.रू.२७/- प्रमाणे प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चास तसेच सदरचा खर्च हा संगणक विभागाकडे असलेल्या JNNURM राखीव निधी मधील तरतूदीमधुन करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११३१ विषय क्रमांक- ४
दिनांक- १८.०५.२०१० विभाग- ड प्रभाग
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक- मा.एकनाथ थोरात
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/डमु/८३/१० दि.१०/५/१०
विषय - संयुक्त महाराष्ट्राच्या सुवर्ण जयंती वर्षानिमित्त मराठी तारका या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत...

विषय क्रमांक ४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११३२ विषय क्रमांक- ५
दिनांक- १८.०५.२०१० विभाग- प्रशासन
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.एकनाथ थोरात
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/४/कावि/३३०/१० दि.७/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

बी.आर.टी.सिस्टीम व नागरी व्यवस्थापन या संदर्भात लंडन, कोपन हेगन, मेक्सिको शहर व बोगोटा या शहरातील प्रत्यक्षात कार्यान्वीत असलेल्या प्रकल्पांची पाहणी करणेसाठी, मनपा मधील बीआरटीएस प्रकल्प विकसीत करणेसाठी व सदर कामास पुर्णपणे जबाबदार असलेल्या २ अधिकाऱ्यांचे नामनिर्देशन पाठविणेस कळविणेत आल्याप्रमाणे मा.आयुक्त श्री.आशिष शर्मा व कार्यकारी अभियंता, श्री.एम.टी.कांबळे या दोन अधिकाऱ्यांना उपरोक्त नमुद केलेल्या ठिकाणी परदेश दौऱ्यास व होणाऱ्या खर्चास तसेच मा.महापौर व मा.अध्यक्ष स्थायी समिती यांस ही सदरचे अभ्यास दौऱ्यास जाण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११३३ विषय क्रमांक- ६
दिनांक- १८.०५.२०१० विभाग-स्थापत्य
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक- मा.प्रेमकुमार नायर
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्थापत्य/अप्रभाग/५१७/१० दि.६/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

तळवडे वॉर्ड क्र.१ येथील इन्फोटेक पार्क कडून चाकणकडे जाणाऱ्या नवीन पुलाशेजारी जकात नाका केबीन बसविणे कामाची निकड लक्षात घेता व कालापव्यय टाळणेसाठी या प्रकारचे काम करणारे ठेकेदाराकडून निविदा/कोटेशन मागविले असता मे.एन.डि.ए.प्लास्टेक यांचे र.रू.३,५६,४००/- चे कोटेशन लघुत्तम असल्याने निविदा न मागविता परंतू करारनामा करून मे.एन.डि.ए.प्लास्टेक यांचेकडून र.रू.३,५६,४००/- चे खर्चात करून घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११९३४ विषय क्रमांक- ७
दिनांक- १८.०५.२०१० विभाग-माध्यमिक शिक्षण
सुचक- मा.वर्षा मडीगेरी अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.माध्य/शि/३/कावि/५२३/१० दि.७/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील सुट्टीचे काळातील मदरसा प्रशिक्षण कोर्सबाबत (सेतू प्रकल्प अंतर्गत) खर्च [एका वर्षाचा र.रू.४,०६,०००/-] अपेक्षित असल्याने सदर उपक्रम राबविणे करीता येणाऱ्या खर्चास तसेच प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११९३५ विषय क्रमांक- ८
दिनांक- १८.०५.२०१० विभाग- लेखा
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.सुरदास गायकवाड
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.लेखा/१२/कावि/२०३/१० दि.२३/४/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या लेखा विभागातील JNNURM ची व राखीव निधीची सर्व खाती यांचे कामकाज सन २००८-०९ या आर्थिक वर्षापासून Tally मध्ये करण्याचे तांत्रिक काम र.रू.१,४२,५००/- [र.रू. एक लाख बेचाळीस हजार पाचशे] मध्ये मे.सतिश नगरे ॲण्ड असोशिएटस्, चार्टर्ड अकाऊंटंट यांना करण्याबाबत कळविलेले असून सन २००५-२००६, २००६-२००७ व २००७-२००८ व त्यानुषंगाने पुढील वार्षिक ताळेबंदपत्रक करण्याच्या दृष्टीने, स्थावर मालमत्तेची माहिती Voucher तपासणी करून तयार करण्याचे काम वार्षिक र.रू.१,५०,०००/- [+ सर्व्हिस टॅक्स स्वतंत्र] फी घेऊन करण्याबाबत करारनामा केला असून तसा आदेश त्यांना दिलेला असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११९३६ विषय क्रमांक- ९
दिनांक- १८.०५.२०१० विभाग- मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.सुमनताई पवळे
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/५/कावि/१५६/१० दि.१०/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या जनगणना विभागाने तातडीने मागणी केलेल्या क्लिप राईटिंग पॅड स्टेशनरी साहित्य खरेदीकामी मे.सिध्दी कॉपियर्स, पिंपरी यांचेकडून क्लिप राईटिंग पॅड स्टेशनरी ५०० नग साहित्याचे लघुत्तम दर एकूण र.रू.११,५००/- स्विकृत करण्यात आलेले असून मे.सिध्दी कॉपियर्स, पिंपरी यांना पुरवठा आदेश निर्गत करण्यात आलेला असल्याने प्रस्तुतकामी केलेल्या तातडीचे कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११३७ विषय क्रमांक- १०
दिनांक- १८.०५.२०१० विभाग-ब प्रभाग
सुचक- मा.राजेंद्र साळुंके अनुमोदक- मा.प्रभाकर वाघेरे
संदर्भ-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.वि/बप्र/३३७/१० दि.११/५/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

ब प्रभागा अंतर्गत पिंपरी येथील डिझेल शवदाहीनी व समाज मंदीरा मध्ये वॉर्डस्तरीय योजनेमधुन विद्युत विषयक कामे करणे कामी दरपत्रके प्राप्त झालेली असून सदरचे काम हे तातडीने असल्याने वॉर्डस्तरीय योजनेतून करण्यात येत असल्याने मे.विमलाई इलेक्ट्रीक कार्पो. यांचेकडून अंदाजपत्रक र.रू. ४९,९६५/- [र.रू.एकोणपन्नास हजार नऊशे पासष्ट] पेक्षा १.२% कमी दराने करारनामा व काम करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११३८ विषय क्रमांक- ११
दिनांक- १८.०५.२०१० विभाग-झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन
सुचक- मा.एकनाथ थोरात अनुमोदक- मा.तानाजी खाडे
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.झोनिपु/वि/कावि/९८६/१० दि.१०/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.सभापती, झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि समाजकल्याण समिती यांना उपलब्ध करून देणेत आलेल्या वाहन क्र.एम.एच-१४-एई०८०३४ या वाहनास नवीन टायर-ट्यूब बसविणे आवश्यक असलेने ५ नग टायर-ट्यूब खरेदीकामी होणारा खर्च र.रू.१३,७५०/- [र.रू.तेरा हजार सातशे पन्नास] मे.बालाजी टायर्स, चिंचवड यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११३९ विषय क्रमांक- १२
दिनांक- १८.०५.२०१० विभाग-नगररचना व विकास
सुचक- मा.प्रेमकुमार नायर अनुमोदक- मा.वर्षा मडीगेरी
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/२क/६७/१० दि.४/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपा हद्दीतील प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेनुसार मौजे भोसरी येथील स.नं.६९० पैकी या मिळकतीमध्ये आरक्षण क्र.४१३ पोलीस चौकी व दवाखानासाठी सुमारे ९ आर क्षेत्र आरक्षित असून सदर आरक्षणाने बाधित जमीनी खाजगी मालकीची असल्याने बाधित होणाऱ्या मिळकतीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ (१) सह भूसंपादन अधिनियम १८९४ अंतर्गत भूसंपादन करणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११४० विषय क्रमांक- १३
दिनांक- १८.०५.२०१० विभाग-स्थापत्य
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/२ब/कावि/१३८/१० दि.११/५/१०
विषय - निविदा नोटीस क्र.२०/१/२००९-१० मधील कामांचे करारनामे करणेस मंजुरी मिळणेबाबत...

विषय क्रमांक १३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक-१११४१ विषय क्रमांक- १४
दिनांक- १८.०५.२०१० विभाग-स्थापत्य
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/२ब/कावि/१३९/१० दि.११/५/१०
विषय - निविदा नोटीस क्र.२०/२/२००९-१० मधील कामांचे करारनामे करणेस मंजूरी मिळणेबाबत...

विषय क्रमांक १४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक-१११४२ विषय क्रमांक- १५
दिनांक- १८.०५.२०१०
सुचक- मा.सुमनताई पवळे अनुमोदक- मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ-१) मा.शकुतला धराडे, मा.ज्योती भारती यांचा प्रस्ताव...
२)मा.महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक २९/३/२०१० ठराव क्र.२८
विषय - महिला बचतगट समता बांधणी प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत...

विषय क्रमांक १५चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक-१११४३ विषय क्रमांक- १६
दिनांक- १८.०५.२०१०
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक- मा.एकनाथ थोरात
संदर्भ-१) मा.सुषमा गावडे, मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव...
२) मा.महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक २९/३/२०१० ठराव क्र.२९
विषय - महिलांना विविध व्यवसाय प्रशिक्षण देणेबाबत...

विषय क्रमांक १६चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक-११९४४ विषय क्रमांक- १७
दिनांक- १८.०५.२०१०
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक- मा.प्रेमकुमार नायर
संदर्भ-१) मा.वैशाली उबाळे, मा.सुषमा गावडे यांचा प्रस्ताव...
२) मा.महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक २९/३/२०१० ठराव क्र.३०

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळ विभागामार्फत बालवाडया चालविल्या जातात या बालवाडयांमध्ये ज्या शिक्षिका मानधन तत्वावर काम करतात त्या शिक्षिकांच्या मानधनात

| | सेवा कालावधी | मानधन र.रु. |
|---|---|---|
| १) | २ ते ४ वर्षे | ३०००/- |
| २) | ४ ते ६ वर्षे | ३५००/- |
| ३) | ६ ते ८ वर्षे | ४०००/- |
| ४) | ८ ते १० वर्षे | ४५००/- |
| ५) | १० ते १२ वर्षे | ५०००/- |
| ६) | १२ ते १४ वर्षे | ६०००/- |
| ७) | १४ ते १६ वर्षे | ६५००/- |
| ८) | १६ ते १८ वर्षे | ७०००/- |
| ९) | १८ ते २० वर्षे | ७५००/- |
| १०) | २० ते २२ वर्षे | ८०००/- |

उपरोक्तप्रमाणे वाढ करण्यास तसेच मुख्य समन्वयक यांना र.रु. १०,०००/- मानधन देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११९४५ विषय क्रमांक- १८
दिनांक- १८.०५.२०१० विभाग- मुख्यलेखापरिक्षण
सुचक- मा.वर्षा मडीगेरी अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ-मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/३९८/१० दि.१२/५/१०

मुख्यलेखापरिक्षण विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११११४६ विषय क्रमांक- १९
दिनांक- १८.०५.२०१० विभाग-स्थापत्य
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.सुरदास गायकवाड
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/२ब/कावि/१४२/१० दि.१२/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२९/२००७-०८ मधील अ.क्र.१५५ अन्वये, मामुर्डी साईनगर परिसरात बंद पाईप गटर करणेकामी मे.एच.सी.लुंकड (नि.र.रू.२३,२४,५००/- [र.रू. तेवीस लाख चोविस हजार पाचशे] पेक्षा ४.०० % जास्त) (सन २००८-०९ च्या चालू दराशी तुलना करता ५.३६ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रू.२४,१७,४८०/- [र.रू. चोविस लाख सतरा हजार चारशे ऐंशी] पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेमधील निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११११४७ विषय क्रमांक- २०
दिनांक- १८.०५.२०१० विभाग-स्थापत्य
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.सुमनताई पवळे
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/२ब/कावि/१४१/१० दि.१२/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२०/२००९-१० मधील अ.क्र.३ अन्वये, प्रभाग क्र.३२ संततुकारामनगर येथील विरंगुळा केंद्राचे स्थापत्य विषयक सुधारणाची कामे करणेकामी मे.शितल कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.१८,७६,५००/- [र.रू.अठरा लाख शहात्तर हजार पाचशे] पेक्षा ८.०० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रू.१७,२६,३८०/- [र.रू.सतरा लाख सव्वीस हजार तीनशे ऐंशी] पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेमधील निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११११४८ विषय क्रमांक- २१
दिनांक- १८.०५.२०१० विभाग- अ प्रभाग
सुचक- मा.राजेंद्र साळुंके अनुमोदक- मा.प्रभाकर वाघेरे
संदर्भ-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.अप्र/कावि/२६७/१० दि.७/५/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.२/२००९-२०१० मधील अ.क्र.२० अन्वये, वॉर्ड क्र.८ से.नं.१३ उर्वरित रस्ते डांबरीकरण करणेकामी मे.गजानन वाल्हेकर (नि.र.रू. ४,६४,९८९/- [र.रू.चार लाख चौसष्ट हजार नऊशे एकोणनव्वद] पेक्षा २८.८० % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११११४९ विषय क्रमांक- २२
दिनांक- १८.०५.२०१० विभाग- अ प्रभाग
सुचक- मा.एकनाथ थोरात अनुमोदक- मा.तानाजी खाडे
संदर्भ-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.अप्र/कावि/४५८/१० दि.१२/५/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.३/२००९-२०१० मधील अ.क्र.१ अन्वये, अ प्रभाग अंतर्गत से.क्र.२६ व मोहननगर जलतरण तलावातील फिल्टरेशन प्लेट संबंधीत यांत्रिक/विद्युत विषयक कामे करणेकामी मे.प्लोमॅक इंजिनिंअरिंग कार्पोरेशन (नि.र.रू.३,१८,३३६/- [र.रू.तीन लाख अठरा हजार तीनशे छत्तीस] पेक्षा १५.३० % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११५० विषय क्रमांक- २३
दिनांक- १८.०५.२०१० विभाग-लेखा
सुचक- मा.प्रेमकुमार नायर अनुमोदक- मा.वर्षा मडीगेरी
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.लेखा/३/कावि/१४२/१० दि.१२/५/१०
विषय :- पी.एम.पी.एल. यांना वेतनासाठी अदा करावयाच्या रकमेबाबत...

विषय क्रमांक २३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११५१ विषय क्रमांक- २४
दिनांक- १८.०५.२०१० विभाग- ड मुख्यालय स्थापत्य
सुचक- मा.राजेंद्र साळुंके अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.डमु/स्था/१०३/१० दि.१२/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन -

ड प्रभाग व मुख्यालयातील रस्त्याचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेचे काम (नि.क्र.६/४-२००९-१० सुमारे ४.३० कोटी रू.) निविदा अट व शर्त क्र.३८ नुसार क प्रभागातील निविदा क्र.६/३-०९/१० मधुन मंजुर निविदा दराने (२४.६९ % कमी)

मे.ठाकुर इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचेकडून करून घेण्यास मान्यता देणेची मागणी मा.आयुक्त यांजकडुन करणेत आली असली तरी प्रशासनाने केलेली कारवाई रद्द करुन मे.मिश्रा असोसिएटस् यांना सदरचे काम देण्यास [सदरचे काम पावसाळ्याचे दिवस लक्षात घेता तातडीने करुन घेण्यास] व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११५२ विषय क्रमांक- २५
दिनांक- १८.०५.२०१० विभाग- नागरवस्ती विकास
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ-१) मा.अति.आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/८/कावि/४५/१० दि.२५/२/१०
२) मा.महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक १२/५/२०१० ठराव क्र.३२

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील यो.क्र.१६ इयत्ता १२ वी नंतरचे वैद्यकिय (M.B.B.S), अभियांत्रिकी संगणक प्रथम वर्ष पदवी परीक्षा यासारखे उच्च शिक्षण घेणा-या युवतींना अर्थसहाय्य देणे या योजनेअंतर्गत प्रस्तावासोबतचे प्रपत्र अ प्रमाणे ०६ लाभार्थींना प्रत्येकी र.रू.७५००/- प्रमाणे एकत्रित र.रु. ४५,०००/- अदा करणेस तसेच या योजनेसाठी प्राप्त अर्जांमध्ये जे अर्ज कागदपत्रांच्या पुर्तते अभावी अपात्र आहेत त्यांनी पूर्तता केल्यास त्यांनासुध्दा योजनेच्या नियमानुसार अर्थसहाय्याचा लाभ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११५३ विषय क्रमांक- २६
दिनांक- १८.०५.२०१० विभाग-नागरवस्ती विकास
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.सुरदास गायकवाड
संदर्भ-१) मा.अति.आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/८/कावि/४४/१० दि.२५/३/१०
२) मा.महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक १२/५/२०१० ठराव क्र.३३

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील यो.क्र.०३ मुलींना तांत्रिक प्रशिक्षणाकामी अर्थसहाय्य देणे या योजने अंतर्गत अर्चना बाळासाहेब धायगुडे यांना र.रु.२,०००/- अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११५४ विषय क्रमांक- २७
दिनांक- १८.०५.२०१० विभाग- नागरवस्ती विकास
सुचक- मा.सुमनताई पवळे अनुमोदक- मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ-१) मा.अति.आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/८/कावि/५१/१० दि.२५/३/१०
२) मा.महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक १२/५/२०१० ठराव क्र.३४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील मुलींना यो.क्र.१० खाजगी क्लासची फी देणेकामी अर्थसहाय्य देणे या योजनेअंतर्गत प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ प्रमाणे २३ लाभार्थींना प्रत्येकी र.रु.१,०००/- प्रमाणे एकत्रित र.रु.२३,०००/- अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक-१११५५ विषय क्रमांक- २८
दिनांक- १८.०५.२०१० विभाग- नागरवस्ती
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक- मा.एकनाथ थोरात
संदर्भ-१) मा.आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/८/कावि/५५/१० दि.३०/३/१०
२) मा.महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक १२/५/२०१० ठराव क्र.३५

सन २००८-०९ या आर्थिक वर्षात यो.क्र.१५ पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील परदेशी उच्च शिक्षण/प्रशिक्षण घेण्या-या युवतींना अर्थसहाय्य देणे या योजनेअंतर्गत ऐश्वर्या अशोक कोटस्थाने व रिमा विजय देवधर यांनी MBA या अभ्यासक्रमासाठी लंडन स्कुल ऑफ मार्केटिंग, लंडन या ठिकाणी प्रवेश घेतला असल्याने योजनेच्या अटी व शर्तीनुसार दोन्ही अर्ज पात्र झाले असल्याने त्यांना प्रत्येकी र.रु.१,००,०००/- याप्रमाणे विद्यापीठाचे नावे अदा करण्यास व त्याकामी येणा-या र.रु. २,००,०००/- चे प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले-</u>

ठराव क्रमांक-१११५६ विषय क्रमांक- २९
दिनांक- १८.०५.२०१० विभाग- पाणीपुरवठा
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक- मा.प्रेमकुमार नायर
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/८३१/१० दि.१८/५/१०
विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात ब वर्ग दर्जाचे पाणीमीटर बसविणे व देखभाल दुरुस्ती करणे इत्यादी (भाग २)

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपा परिसरात सर्वत्र मीटर पद्धत होणेच्या दृष्टीने (अंदाजपत्रकीय तरतुद पानांक ५६१, अ.क्र.१) च्या विषयांकीत कामासाठी नदीच्या पाण्याचा आकार (अंदाजपत्रकीय तरतुद पानांक १४२,अ.क्र.६) या लेखाशिर्षावरील एकूण तरतुद र.रु.२२ कोटी पैकी र.रु.२.०० कोटी एवढी तरतुद विषयांकीत कामासाठी २०१०-११ चे अंदाजपत्रकात पाणीपुरवठा योजनानिधी, इतर कामे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात ब वर्ग दर्जाचे पाणीमीटर बसविणेचा लेखाशिर्षासह (पा.क्र.५६१ अ.क्र.१) वर्ग करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११९५७ विषय क्रमांक- ३०
दिनांक- १८.०५.२०१० विभाग- माध्यमिक शिक्षण
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक- मा.एकनाथ थोरात
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.माध्य/शि/३/कावि/५३७/१० दि.१७/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन-

इयत्ता १०वी व १२ वी नंतर पुढे काय? कार्यशाळेच्या आयोजनासाठीचा खर्च थेट पद्धतीने करारनामा न करता करावयाचा असल्याने एकवेळच्या कार्यक्रमास अंदाजे र.रु.२५,०००/- याप्रमाणे २ वेळा वेगवेगळ्या ठिकाणी कार्यक्रम घेण्यासाठी येणाऱ्या खर्चास व प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चास तसेच सदरचा कार्यक्रम ड प्रभाग हद्दीत/विभागात ही सुयोग्य ठिकाणी आयोजीत करण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११९५८ विषय क्रमांक- ३१
दिनांक- १८.०५.२०१० विभाग- माध्यमिक शिक्षण
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.सुरदास गायकवाड
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.माध्य/शि/३/कावि/५३२/१० दि.१७/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती पुणे यांचेकडून निविदा न मागविता करारनामा न करता थेट पद्धतीने आगाऊ रक्कम देवून क्रमिक पुस्तके खरेदी करणेस व हस्तपुस्तिका खरेदी करणेकामी अंदाजे र.रु.१०,००,०००/- च्या खर्चास व प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चास व पुस्तके वाहतुक खर्चासह मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११९५९ विषय क्रमांक- ३२
दिनांक- १८.०५.२०१० विभाग- अ प्रभाग
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.सुमनताई पवळे
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.कप्र/१/कावि/४८१/१० दि.१८/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

चार्ज ऑफिसर तथा प्रभाग अधिकारी यांना अग्रीम खर्चासाठी दिलेल्या र.रु.५०,०००/- रक्कमेस व त्या रकमेतून चार्ज ऑफीसर तथा प्रभाग अधिकारी यांनी केलेल्या [घरयादी माहिती पुस्तिका व NPR माहिती पुस्तिका प्रत्येकी २५० नग झेरॉक्ससह] र.रु.२२,२५०/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११६० विषय क्रमांक- ३३
दिनांक- १८.०५.२०१० विभाग- अ प्रभाग
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.सुमनताई पवळे
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.अप्र/२/कावि/६२/१० दि.१७/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

चार्ज ऑफिसर तथा प्रभाग अधिकारी यांना अग्रीम खर्चासाठी दिलेल्या र.रु.५०,०००/- रक्कमेस व त्या रकमेतून चार्ज ऑफीसर तथा प्रभाग अधिकारी यांनी केलेल्या [१) प्रशिक्षण व साहीत्य वाटप चहापान खर्च र.रु.१६,२००/- २) पिण्याच्या पाण्यासाठी स्टिल पिंप जग व स्टिल ग्लास र.रु.३,६९२/- ३) घरयादी माहिती पुस्तिका व NPR माहिती पुस्तिका प्रत्येकी २५० नग झेरॉक्ससह र.रु.२२,२५०/-] र.रु.४२,१४२/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११६१ विषय क्रमांक- ३४
दिनांक- १८.०५.२०१० विभाग- वैद्यकीय
सुचक- मा.राजेंद्र साळुंके अनुमोदक- मा.प्रभाकर वाघेरे
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वैद्य/६/कावि/३३८/१० दि.१८/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रियस ॲण्ड अग्रीकल्चर, सेनापती बापट मार्ग, पुणे येथे वातावरण बदलांबाबत राज्यस्तरीय परिषद आयोजित करणेसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सहभाग म्हणुन र.रु.५,००,०००/- मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज ॲण्ड अग्रीकल्चर यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११६२ विषय क्रमांक- ३५
दिनांक- १८.०५.२०१० विभाग- भुमि आणि जिंदगी
सुचक- मा.राजेंद्र साळुंके अनुमोदक- मा.प्रभाकर वाघेरे
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.भुजि/६/कावि/३०५/१० दि.१२/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

से.नं.२३ वाहतुकनगरी जकात नाका भुखंड आवारातील उर्वरीत मोकळ्या जागेत १५X२० चौ. फुट एकुण क्षेत्रफळ ३०० चौ.फुट मोकळी जागा उपहारगृह या प्रयोजनासाठी भुईभाडे तत्वानुसार र.रु.७/- प्रति चौ.फुट प्रति महा (मनपा व शासन कराव्यतिरिक्त) ११ महिने कालावधीसाठी भाडेकराराने देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११६३ विषय क्रमांक- ३६
दिनांक- १८.०५.२०१० विभाग- ड प्रभाग विद्युत
सुचक- मा.एकनाथ थोरात अनुमोदक- मा.तानाजी खाडे
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वि/डप्र/३५३/१० दि.१८/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

ड प्रभागातील पिंपरी येथे महाराष्ट्र राज्य स्थापना सुवर्ण महोत्सवानिमित्त मनपाच्या वतीने आयोजित मराठी तारका कार्यक्रमाकरीता तात्पुरत्या स्वरुपाची ध्वनीक्षेपण,जनित्र व्यवस्था व प्रकाश व्यवस्था करणेसाठी र.रु.६९,५८०/- एजंसीला [मे.मोरया मंडप डेकोरेटर्स] करारनामा न करता थेट पद्धतीने अदा करणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११६४ विषय क्रमांक- ३७
दिनांक- १८.०५.२०१० विभाग- स्थापत्य क मुख्यालय
सुचक- मा.प्रेमकुमार नायर अनुमोदक- मा.वर्षा मडीगेरी
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/३क/कावि/५९/१० दि.१८/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.०९/२००८-०९ मधील अ.क्र.०२ अन्वये, क प्रभागातील लांडेवाडी ते चांदणी चौक रस्त्याचे रुंदीकरण करणेकामी मे.एच.सी.लुंकड (नि.र.रू.२१,००,०००/- [र.रू.एकवीस लाख] पेक्षा ३७.३० % कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने काम करुन घेण्यास तसेच निविदा रकमेच्या १०% पर्यंत निविदा अटीप्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तीनही मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११६५ विषय क्रमांक- ३८
दिनांक- १८.०५.२०१०
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.प्रभाकर वाघेरे
संदर्भः-मा.जयश्री गावडे, मा.सुलोचना बढे यांचा प्रस्ताव-

पिं.चिं.म.न.पा.च्या लॅंडस्केपिंग पॅनेलवर मे.माणिक बुचडे मागील चार वर्षापासुन कार्यरत आहेत त्यांचेकडे विविध प्रकल्पाचा पुरेसा अनुभव असलेने त्यांची मनपाच्या वास्तुविशारद (Archi.) पॅनेलवर नेमणुक करणेस तसेच मनपाच्या पिंपळेगुरव येथील आरक्षण क्र. ३४५ येथील प्रेक्षागृह इमारत बांधणे प्रकल्पाचे आराखडे,नकाशे व अंदाजपत्रके तयार करणेचे काम व Council of Architect प्रमाणे त्याची फी अदा करणेचे काम आर्किटेक्ट माणिक बुचडे यांना देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक-१११६६ विषय क्रमांक- ३९
दिनांक- १८.०५.२०१०
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ:-मा.जयश्री गावडे,मा.सुलोचना बढे यांचा प्रस्ताव-

नवमहाराष्ट्र बेरोजगार संघ फुगेवाडी व श्री.संत गाडगे बाबा महाराज बेरोजगार संस्थेकडून अनुक्रमे वॉर्ड क्र. १०२ व वॉर्ड क्र.१०४ दापोडी येथील स्वच्छता गृहाची देखभाल व साफसफाई तसेच दैनंदिन साफसफाई पुढील तीन वर्षे कालावधीत मनपा दराने करुन घेण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक-१११६७ विषय क्रमांक- ४०
दिनांक- १८.०५.२०१०
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.एकनाथ थोरात
संदर्भ:-मा.जितेंद्र ननावरे,मा.एकनाथ थोरात यांचा प्रस्ताव-

ब प्रभागातील कीटकनाशक,औषध फवारणी, धूरीकरण व हौसींग काम पुढील एक वर्ष कालावधीकरीता मनपा दराने देण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक-१११६८ विषय क्रमांक-४१
दिनांक- १८.०५.२०१०
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक-मा.एकनाथ थोरात
संदर्भ:-मा.जयश्री गावडे, मा.सुलोचना बढे यांचा प्रस्ताव-

भोसरी येथील कै.आनंदराव लांडगे व्यायाम शाळेत नागरिकांच्या सोईसाठी विवीध अद्ययावत व्यायाम साहित्य उपलब्ध करुन देण्यास व सध्या असलेल्या साहित्याची व्यायाम शाळेची दुरुस्ती करुन घेण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक-१११६९ विषय क्रमांक- ४२
दिनांक- १८.०५.२०१०
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.एकनाथ थोरात
संदर्भ:-मा.जितेंद्र ननावरे, मा.एकनाथ थोरात यांचा प्रस्ताव-

मनपा कासारवाडी शाळेतील काही खोल्या सध्या चालू असलेल्या शाळेस अडचण येणार नाही याची दक्षता घेवुन दुपार सत्रामध्ये भाडयाने देण्यास व त्याकामी करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक-१११७० विषय क्रमांक- ४३
दिनांक- १८.०५.२०१०
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ:-मा.जयश्री गावडे, मा.सुलोचना बढे यांचा प्रस्ताव-

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क प्रभाग मुख्यालय सन २०१०/११ या आर्थिक वर्षात मे.अनुजा कन्स्ट्रक्शन यांना बील अदायगी तरतूद कमी पडत असल्याने प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक-१११७१ विषय क्रमांक- ४४
दिनांक- १८.०५.२०१०
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक-मा.एकनाथ थोरात
संदर्भ:-मा.जयश्री गावडे, मा.सुलोचना बढे यांचा प्रस्ताव-

मालेगांव अंध शिक्षण व प्रशिक्षण संस्था,मालेगांव हि नोंदणीकृत संस्था अंध अपंग मुलांच्या शैक्षणिक आणि संपूर्ण पुनर्वसनकरीता गेल्या २० वर्षापासून कार्यरत आहे. या संस्थेत शिक्षणाबरोबरच निवासाचीही सोय असणारी एकमेव संस्था आहे व या विद्यार्थ्याचे शिक्षण पूर्ण झालेनंतर त्यांना पुरेसा रोजगार उपलब्ध करुन देऊन त्यांचे सामाजिक पुनर्वसन करुन देणे हा या संस्थेचा मुख्य हेतू आहे. पुणे जिल्हा विद्येचे माहेरघर असल्याने व परिसरात रोजगारांच्या असंख्य संधी उपलब्ध असलेने आणि मुंबई,नाशिक,औरंगाबाद,कोल्हापूर पासून समान अंतरावर असल्याने सर्वाशी योग्य समन्वय साधता येईल या उद्देशाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आकुर्डी पांढारकरवस्ती येथिल पांडूरंग काळभोर सभागृह मालेगांव अंध शिक्षण संस्थेस २५ वर्षासाठी नाममात्र भाडयाने देण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक-१११७२ विषय क्रमांक- ४५
दिनांक- १८.०५.२०१०
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक-मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ:-मा.जयश्री गावडे, मा.सुलोचना बढे यांचा प्रस्ताव-

अ प्रभाग विद्युत विभागांतर्गत होणा-या विवीध कार्यक्रमाकरीता तात्पुरत्या स्वरुपात ध्वनीक्षेपण व प्रकाश व्यवस्था करणेचे कामाची सुधारीत खर्च र.रु.९,९१,९९२/- (वाढीव र.रु.५,२०,८२२/-) एजन्सी मे.मोरया मंडप डेकोरेटर्स, चिंचवड यांचेकडुन याच कामाचे निवीदा क्र. १/८७-०८/०९ अन्वयेचे ठराव क्र.६८७४ दि.२३/१२/०८ अन्वयेचे पुर्व स्विकृत निवीदा दर At par या दराने अनामत रक्कम घेऊन व करारनामा करुन,वाढीव काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक-१११७३ विषय क्रमांक- ४६
दिनांक- १८.०५.२०१०
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.एकनाथ थोरात
संदर्भ:-मा.जितेंद्र ननावरे, मा.एकनाथ थोरात यांचा प्रस्ताव-

मा.स्थायी समितीची यापुढील प्रत्येक मंगळवारची साप्ताहीक सभा दुपारी ४.०० ऐवजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(प्रशांत कृष्णराव शितोळे)
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक- नस/०९/कावि/६८६/२०१०
दिनांक- २०/०५/२०१० चे लगत

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.